# सेवार्थ प्रणालीतील एकूण मंजूर पदसंख्या, भरलेली पदसंख्या व रिक्त पदसंख्या यांची अचूक माहिती प्राप्त होण्यासाठी करावयाच्या आवश्यक बाबींसंबंधी सूचना

दिनांक १३/०९/२०१२ रोजी मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये ठरल्याप्रमाणे वित्त विभागाने सर्व प्रशासकीय विभागांना त्यांच्या अधिपत्याखालील आहरण व संवितरण अधिकारी यांची यादी, एकूण मंजूर पदसंख्या, भरलेली पदसंख्या आणि कर्मचाऱ्यांची संख्या यांची माहिती सेवार्थ प्रणालीतून काढून दिनांक २०/०९/२०१२ च्या अर्धशासकीय पत्रान्वये पाठविली आहे. सर्व विभागांनी सदरची माहिती तपासून वित्त विभागाच्या सूचनांप्रमाणे कार्यवाही करुन वित्त विभागास दिनांक २०/१०/२०१२ पर्यन्त परत करावयाची आहे. त्यानंतर वित्त विभाग सदर माहितीचे विश्लेषण करुन संख्या निश्चित करेल व प्रणालीतील संख्येची तफावत दूर करण्याची कार्यवाही करेल.

दिनांक १५/१०/२०१२ रोजी प्रशासकीय विभागनिहाय घेतलेल्या आढावा बैठकीअंती दिनांक २०/०९/२०१२ च्या पत्रान्वये पाठविण्यात आलेल्या माहितीमध्ये तफावत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे सर्वंकष विचार करुन वित्त विभागाने आता सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांची पदविषयक अचूक माहिती प्राप्त होण्यासाठी सेवार्थ प्रणालीवरच पर्याय उपलब्ध करुन देण्याचे ठरविले आहे. त्याप्रमाणे प्रत्येक आहरण व संवितरण अधिकाऱ्याला त्यांच्या संकेतांकाने प्रणालीत प्रवेश केल्यानंतर माहिती भरण्याकरीता सुविधा उपलब्ध होईल.

**सदर सुविधेव्दारे माहिती भरण्यापूर्वी खालीलप्रमाणे दक्षता घ्यावी.**

आहरण व संवितरण अधिकाऱ्याने त्यांच्या कार्यालयासंदर्भात आकृतीबंधानुसार सेवार्थ प्रणालीवर भरलेली कर्मचाऱ्यांची संख्या व वेतनपटाद्वारे वेतन आहरित करणारे कर्मचाऱ्यांच्या संख्येबाबत ताळमेळ घ्यावा. सदर ताळमेळात आढळलेले सेवार्थ प्रणालीवर आहेत परंतु वेतनपटावर नाहीत अशा कर्मचारी पुढील पैकी कोणत्या प्रकारात मोडतात याची शहानिशा करण्यात यावी ---

१) सेवा निवृत्त / मृत / सेवेतून काढण्यात आलेले
२) प्रतिनियुक्तीवर गेलेले
३) बदली झालेले परंतु सेवार्थ प्रणालीतून Detach केले नाही
४) बदलून आलेले परंतु सेवार्थ प्रणालीत Attach केले नाही
५) पद रिक्त असल्या कारणाने

वरील १ ते ५ प्रकारामुळे उद्भवलेली तफावत दूर करुन वेतनपटातील कर्मचारी संख्या व प्रणालीतील संख्या निश्चित करण्यात यावी, असे करताना ---

१. सेवा निवृत्त / मृत / सेवेतून काढण्यात आलेले कर्मचारी हे Deactivate करावे,
२. प्रतिनियुक्तीवर गेलेले, बदली झालेले परंतु सेवार्थ प्रणालीतून Detach केले नाही, अशा कर्मचाऱ्यांना Detach करावे.
३. बदलून आलेले परंतु सेवार्थ प्रणालीत attach केले नाही, हे कर्मचारी attach करावे. त्यानंतर जे उर्वरित आहेत त्यापैकी रिक्त पदांची संख्या निश्चित करावी.

वरील प्रमाणे कार्यवाही केल्यानंतर सेवार्थ प्रणालीतील पदांची संख्या व वेतन पटावरील पदांची संख्या ही निश्चित होईल.

**आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी करावयाच्या कार्यवाहीचे टप्पे**

सेवार्थ प्रणालीमध्ये भरण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या आणि प्रत्यक्ष वेतनपट यातील संख्या याचा ताळमेळ घेण्यासाठी आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी करावयाची कार्यवाही :-

सहाय्यकाने (**Assistant**) त्यांच्या लॉगिन पासवर्डने प्रवेश केल्यानंतर पुढीलप्रमाणे मार्गक्रमण करुन प्रणालीमध्येच अचूक माहिती भरावयाची आहे. **Worklist→Payroll→DDO Profile→Post/ Employee Details Correction.**

**१ Part A - सेवार्थ प्रणालीमध्ये नोंद असणाऱ्या पदांची व कर्मचाऱ्यांची स्थिती दर्शविण्यात आलेली आहे.**

**२ Part B - आकृतीबंधानंसार/कार्यालयातील अभिलेखानुसार मंजूर पदे व कर्मचाऱ्यांची अचूक पदसंख्या सहाय्यकाने या ठिकाणी भरावी.**

**३. Part C - Part A व Part B मध्ये भरण्यात आलेल्या माहितीनुसार अधिक/वजा पदांची संख्या या ठिकाणी दिसून येईल.**

**४. Part D - Part C मध्ये दिसून आलेल्या तफावतीबाबत सहाय्यकाने या ठिकाणी स्पष्टीकरण द्यावे.**

**५. उपरोक्त सर्व तक्त्यात माहिती भरुन झाल्यानंतर प्रथम सदर माहिती सेव्ह करावी व त्यानंतर त्याची प्रिंट काढून त्यावर आहरण व संवितरण अधिकाऱ्याची स्वाक्षरी घेऊन संबंधित प्रशासकीय विभागाकडे सूपूर्द करावी.**

**६. अत्यत महत्त्वाच - सहाय्यकाला उपरोक्त माहिती प्रिंट काढण्यापूर्वी कितीही वेळा बदलता येईल परंतु एकदा सदर माहितीची प्रिंट काढल्यानंतर या माहितीमध्ये कोणताही बदल करता येणार नाही याची दक्षता घ्यावी. जर प्रिंट काढल्यानंतर सदर माहिती चुकीची असल्याचे निदर्शनास आल्यास याची संपूर्ण जबाबदारी संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्याची राहील याची नोंद घ्यावी.**

प्रशासकीय विभागाने सर्व आहरण व संवितरण अधिकारी निहाय अहवाल वित्त विभागास सादर करावा. या अहवालामध्ये आकृतीबंधानुसार सेवार्थ प्रणालीतील पदांची संख्या वेतन पटावरील पदांची संख्या व त्यातील तफावतीचा तपशील आहरण व संवितरण अधिकारी निहाय वित्त विभागास उपलब्ध करुन द्यावा. त्यानुसार वित्त विभाग आवश्यक कार्यवाही करेल.